# युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्र.: बी ओ एम / आर एस आर / ३५४ / ०३ -०६-१९६७

युनियन बँक बिल्डींग, ४था मजला, रुम नं. १९, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ २२६२१९४८४ / ३५११४२४६ / ५२ ई-मेल : ubicrsoc@gmail.com Web : unionbankcreditsociety.com

Mobile App. : UBICRSOCIETY


परिपत्रक क्र. ०२/२०२५-२६ दि. १४/०७/२०२५

## कर्जमागणी अर्जासंबंधी परिपत्रक

सन्माननीय सभासद,

आमच्या असे निदर्शनास आले आहे की, सभासद कर्ज अर्ज पाठविताना अनेक त्रुटींसह अर्ज पाठवित आहेत. त्यामुळे कर्ज मंजूर करण्यासाठी वेळ जात आहे. तरी सभासदांनी कर्ज अर्ज पाठविताना खालील सुचनांचे पालन करावे व काही अडचण असल्यास संस्थेत फोन करुन माहिती घ्यावी.

### १) कर्ज अर्ज भरणे :-

अ) कर्ज अर्ज काळजीपूर्वक भरावा. कोणत्याही प्रकारची खाडाखोड किंवा व्हाईट इंकचा वापर करु नये.

ब) कर्ज रक्कम लिहिताना आपल्या सभासदत्वाच्या कालावधीचा विचार करुन लिहावी.

क) अर्धवट व चुकीचा भरलेला अर्ज स्विकारला जाणार नाही.

### २) जामीनदार सह्या :-

अ) कर्जमर्यादा रु. १५.०० लाख असल्याने फक्त दोन सभासदांच्या सह्या घ्याव्यात. दोनपेक्षा अधिक सह्या घेतल्यास कर्ज अर्ज स्विकारला जाणार नाही.

ब) जामीनदारकीची रक्कम रु. १५.०० लाखापर्यंत मर्यादित असल्याने जामीनदाराच्या सह्या घेण्यापूर्वी त्यांची जामीनकी रक्कम संस्थेच्या मोबाईल ॲप मध्ये किंवा संस्थेत फोन करुन विचारुन घ्यावी.

क) जामीनदारांनी आपली सही संस्थेतील नमुना सहीप्रमाणे केलेली असावी.

ड) जामीनदार सभासदाची कमीत-कमी एक महिन्याची वर्गणी पगारातून वसूल झालेली असावी व निव्वळ पगार २५ टक्के च्या वर असावा.

### ३) स्टॅम्प पेपर :-

अ) कर्ज अर्जासोबत रु. ५००/-चा स्टॅम्प पेपर किंवा रु. ५००/- चे फ्रँकींग असावे. (महाराष्ट्र राज्यातील)

ब) स्टॅम्प पेपरवर कर्जदार व जामीनदार यांची नावे, पी.एफ. नंबर व सही असावी.

क) स्टॅम्प पेपर करारपत्रासाठीचा (Agreement) असावा. ॲफीडेव्हीट किंवा अनेक्सर - I चा स्टॅम्प पेपर स्विकारला जाणार नाही.

ड) स्टॅम्प पेपरवर कारण या ठिकाणी फक्त "कर्ज" असे लिहावे. पहिला पक्षकार सभासदाचे पूर्ण नाव व दुसरा पक्षकार "युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि. मुंबई." असे पूर्ण लिहिलेले असावे.

इ) स्टॅम्प पेपरवर दुसऱ्या पक्षकाराचे नाव "युनियन बँक ऑफ इंडिया" असे लिहिले असल्यास सदर स्टॅम्प पेपर स्विकारला जाणार नाही. तसेच जुना व वैधता संपत आलेला स्टॅम्प पेपर स्विकारला जाणार नाही.

### ४) कागदपत्रे :-

अ) कर्जदार व जामीनदार यांची बँक शाखा व्यवस्थापक/विभागप्रमुख /अधिकारी यांनी प्रमाणित केलेली सही व शिक्का असलेली शेवटच्या महिण्यातील पगारपत्रके कर्ज अर्जासोबत जोडावीत.

ब) कर्जदाराने आधार कार्ड व पॅन कार्डची स्वतः साक्षांकित केलेली प्रत जोडावी.

क) युनियन बँकेच्या एच.आर. खात्याकडून एन. ओ.सी. घ्यावी व ती कर्ज अर्जासोबत जोडावी.

ड) कर्ज अर्ज पूर्ण झाल्यावर अगोदर संस्थेच्या मेलवर (ubicrsoc@gmail.com) स्कॅन करुन पाठवणे व ती बरोबर असल्याची संस्थेकडून खात्री करुन घ्यावी. त्यानंतरच मुळ कर्ज अर्ज कागदपत्रांसह पाठवून देणे.

अधिक माहितीसाठी संस्थेत संपर्क करावा.

-: आपले नम्र :-

श्री. राजेश मनोहर मतकरी
अध्यक्ष

श्री. सचिन अशोक नरहरी
उपाध्यक्ष

श्री. प्रशांत संभाजी सुर्वे
मानद सचिव

श्री. रामचंद्र कृष्णा कासारे
सहसचिव

श्री. रोहन गुलाबराव गोडसे
खजिनदार

**समस्त संचालक मंडळ**